24 NOV 2021

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नवोन्मेष' उपक्रम समाजाशी जोडणार

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठात 'इनोव्हेशन मीट'चे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

टेंबलाईवाडी, ता. २३ : ''नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा प्रयत्न आहे,'' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

महाराष्ट्र राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाउंडेशन (सेक्शन-८ कंपनी), विद्यापीठाचे इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्रातर्फे 'इनोव्हेशन मीट'चे उद्‌घाटन झाले. तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. शिर्के म्हणाले, ''नागरिक, छोटे उद्योजक, व्यावसायिक, विद्यार्थ्यांकडे अनुभवातून किंवा कल्पनेमधील नवसंकल्पना असतात. अनेक सर्वसामान्य नागरिकांच्या मनातही काही अभिनव संकल्पना असतात. मात्र त्या मांडावयाच्या कोणाकडे आणि प्रत्यक्षात आणावयाच्या कशा, याविषयी त्यांच्या मनात संभ्रम असतो. विद्यार्थ्यांच्या मनातही त्यांच्या अभ्यासाद्वारे, संशोधनाद्वारे अनेक कल्पना मूळ धरतात. त्यांनाही मूर्तरूप देण्यासाठी साहाय्याची, शिक्षकांच्या मार्गदर्शन, सहकार्याची आवश्यकता असते. अशा सुप्त नवसंकल्पनांना मंच प्रदान करण्याच्या हेतूने विद्यापीठाने नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. या नवोन्मेष परिषदेत मांडल्या जाणाऱ्या प्रत्येक संकल्पनेवर ज्या त्या संकल्पकाची मालकी अबाधित राहील, याची दक्षता विद्यापीठ प्रशासन घेईल.''




**शिवाजी विद्यापीठात आयोजित इनोव्हेशन मीटमध्ये बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

### नवोन्मेष संकल्पनांचे प्रस्ताव

दरम्यान, इनोव्हेशन मीटसाठी समाजाच्या विविध घटकांकडून ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात १३८ नवोन्मेष संकल्पनांचे प्रस्ताव प्राप्त झाले. या प्रस्तावांचे व्यवस्थापन, मॅकेनिकल व ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान व संगणक, अन्न व प्रक्रिया, कृषी, पर्यावरण व पर्यटन आणि आरोग्य अशा सहा विभागांमध्ये वर्गीकरण करण्यात येऊन दिवसभरात २७ विषयतज्ज्ञांसमोर त्यांचे गटनिहाय सादरीकरण केले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''आजकाल सर्वच कंपन्यांचे लक्ष विविध पेटंट्सकडे असते. त्यातील उपयुक्त पेटंटचा वापर ते व्यावसायिक उत्पादनासाठी करण्याची शक्यता असते. मात्र, त्यासाठी त्यांची खात्री पटावी लागते. म्हणून संशोधकांकडे मूलभूत संकल्पना, सक्षमता आणि संयम या गोष्टी असणे आवश्यक असते.''

इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी स्वागत केले. पर्यावरण अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

24 NOV 2021 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘नवोन्मेष’ समाजाशी दृढपणे जोडण्याचा उपक्रम

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठात ‘इनोव्हेशन मीट’ उत्साहात



कोल्हापूर : नवोन्मेष परिषदेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एम. एस. देशमुख.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा महत्त्वाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. महाराष्ट्र राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाऊंडेशन (सेक्शन-८ कंपनी) आणि विद्यापीठाचे इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘इनोव्हेशन मीट’च्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला.

डॉ. शिर्के म्हणाले, सुप्त नवसंकल्पनांना मंच देण्याच्या हेतूने विद्यापीठाने नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे.

डॉ. पाटील म्हणाले, नवनिर्मितीपासून शाश्वत विकासाकडे आपल्याला वाटचाल करावयाची आहे, याचे भान संशोधकांकडे असावे. त्याचप्रमाणे मांडल्या जाणाऱ्या नवसंकल्पना प्रत्यक्षात आणल्या जातील, अशा स्वरूपाच्या असाव्यात.

स्वागत व प्रास्ताविक इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

24 NOV 2021 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवंत सेवकांमुळेच लौकिक

## डॉ. वासंती रासम ; गुणवंत शिक्षक, कर्मचाऱ्यांचा गौरव



कोल्हापूर : येथील रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे स्वाती खराडे यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. वासंती रासम. शेजारी प्राचार्य डॉ. बी. एम. हिर्डेकर, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, शाखा अध्यक्ष विजय हरगुडे आदी.

कोल्हापूर, ता. २३ : गुणवंत शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळेच शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वाढला असल्याचे गौरवोद्गार वारणा शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. वासंती रासम यांनी काढले. येथील श्री रवळनाथ को-ऑपरेटीव्ह हौसींग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित गुणवंत शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सत्कारावेळी त्या बोलत होत्या. माजी परीक्षा नियंत्रक प्राचार्य डॉ. बी. एम. हिर्डेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. बी. एम. हिर्डेकर म्हणाले, ''कर्म हीच पूजा मानणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामगिरीची उचित नोंद विद्यापीठाने घेतली आहे. अशा गुणवंत सेवकांमुळेच विद्यापीठाची घोडदौड सुरू आहे.'' गुणवंत प्राचार्य पुरस्कारप्राप्त प्राचार्य डॉ. रमेश कुंभार, गुणवंत शिक्षक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, संगणक विभागाच्या संचालिका स्वाती खराडे, सहाय्यक अधीक्षक फिरोज नाईकवडी, विनायक लाड, विजय आयरेकर, बबन चौगुले आदींचे सत्कार झाले. संचालक प्रा. विजयकुमार घुगरे, प्राचार्या मीना रिंगणे, शाखा सल्लागार प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे, प्रा. आर. एस. पाटील, अमृत सुतार, भास्कर सांगावकर, प्रा. डॉ. रविंद्र पोर्लेकर, शाखाधिकारी पंकज कुंभार आदी उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. शाखा चेअरमन विजय हरगुडे यांनी स्वागत केले. सल्लागार प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. अण्णासाहेब कलगोंडा यांनी आभार मानले.